## जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक सामान्य/कक्ष ४/सेतू/F.१४३३७६३४८७८८७.—महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश,२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा, याद्वारे उक्त अध्यादेश प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त महसूल कार्यालयामार्फत नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे :—

### परिशिष्ट

| अ. क्र. (१) | लोकसेवेचा तपशील (२) | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (दिवस) (३) | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम (४) | प्रथम अपील अधिकाऱ्याचे पदनाम (५) | द्वितीय अपील अधिकाऱ्याचे पदनाम (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र. | १५ | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. | अपर जिल्हाधिकारी |
| २ | जातीचे प्रमाणपत्र | २१ | उप विभागीय अधिकारी/ उप जिल्हाधिकारी. | अपर जिल्हाधिकारी. | जिल्हाधिकारी |
| ३ | उत्पन्न प्रमाणपत्र | १५ | नायब तहसीलदार | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. |
| ४ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | २१ | उपविभागीय अधिकारी उप जिल्हाधिकारी. | अपर जिल्हाधिकारी. | जिल्हाधिकारी |
| ५ | तात्पुरता रहिवास प्रमाणपत्र | ७ | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. | अपर जिल्हाधिकारी. |
| ६ | ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र | ७ | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. | अपर जिल्हाधिकारी. |
| ७ | ऐपतीचा दाखला | २१ | नायब तहसीलदार (रु. २ लाख पर्यंत.) | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. |
| | | | तहसीलदार (रु. २००००१ ते ८ लाख पर्यंत). | उप विभागीय अधिकारी. | अपर जिल्हाधिकारी |
| | | | उप विभागीय अधिकारी (रु. ८००००१ ते ४० लाख पर्यंत) | अपर जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| | | | जिल्हाधिकारी (४० लाखावरील. | अपर आयुक्त | विभागीय आयुक्त |
| ८ | सांस्कृतीक कार्यक्रम परवाना | ७ | तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी. | उप विभागीय दंडाधिकारी. | अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी. |
| | | | अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी. | जिल्हा दंडाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ९ | अधिकार अभिलेखाची प्रमाणित प्रत | ७ | लिपिक/तलाठी | नायब तहसीलदार | तहसीलदार |
| १० | अल्प भू-धारक दाखला | १५ | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. | अपर जिल्हाधिकारी |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ११ | भूमीहीन शेतमजूर असल्याचा दाखला. | १५ | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. | अपर जिल्हाधिकारी |
| १२ | शेतकरी असल्याचा दाखला. | १५ | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. | अपर जिल्हाधिकारी |
| १३ | डोंगर/दुर्गम क्षेत्रात रहात असल्याचे प्रमाणपत्र. | ७. | तहसीलदार | उप विभागीय अधिकारी. | अपर जिल्हाधिकारी |
| १४ | प्रतिज्ञापत्र साक्षांकित करणे | १ | अव्वल कारकून/ नायब तहसीलदार. | नायब तहसीलदार/ तहसीलदार. | उप विभागीय अधिकारी. |

ठाणे,
दिनांक १३ जुलै २०१५.

अशोक शिनगारे,
जिल्हाधिकारी, ठाणे.

---

**BY THE COLLECTOR OF THANE**

*NOTIFICATION*

No. GEN/DESK-IV/SETU/F1433763487887.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 3 of the Maharashtra Right To Public Services Ordinance, 2015 (Mah.Ord. No.V of 2015). I, the Collector of Thane District, hereby notify the public services rendered by the office of the Collector through the subordinate Revenue offices, along with the stipulated time limits for providing such public services, the Designated Officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended herewith, for the purposes of the said Ordinance.

*Schedule*

| Sr. No. | Public Service | Time limit for providing service (days) | Designated Officer | First Appellate Officer | Second Appellate Officer |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Age, Nationality and Domicile Certificate. | 15 | Tahsildar | Sub Divisional Officer. | Additional Collector. |
| 2 | Cast Certificate | 21 | Sub Divisional Officer/Deputy Collector. | Additional Collector. | Collector |
| 3 | Income Certificate | 15 | Nayab Tahsildar | Tahsildar | Sub-Divisional Officer. |
| 4 | Non Creamy Layaer Certificate. | 21 | Sub Divisional Officer/Deputy Collector. | Additional Collector. | Collector |
| 5 | Temporary Residence Certificate. | 7 | Tahsildar | Sub Divisional Officer. | Additional Collector. |
| 6 | Senior Citizen Certificate. | 7 | Tahsildar | Sub Divisional Officer. | Additional Collector. |
| 7 | Solvency Certificate | 21 | Nayab Tahisildar | Tahsildar Officer. | Sub Divisional Officer. |

*Schedule*—Conlded.

| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
|---|---|---|---|---|---|
| | | | Tahsildar (Rs. 200001 to 8 Lacs. | Sub Divisional Officer. | Additional Collector. |
| | | | Sub Divisional Officer. (Upto Rs. 800001 to 40 Lacs) | Additional Collector. | Collector |
| | | | Collector (Above Rs. 40 Lacks) | Additional Commissioner. | Divisional Commissi-oner. |
| 8 | Permission for Cultural Programme. | | Tahsildar and Taluka Executive Magistrate. | Sub Divisional Magistrate. | Additional District Magistrate. |
| | | | Additional District Magistrate. | District Magistrate. | Divisional Commissi-oner. |
| 9 | Certified Copy Record of Rights. | 7 | Clerk/Talathi | Nayab Tahsildar. | Tahsildar |
| 10 | Small Land Holder Certificate. | 15 | Tahsildar | Sub Divisional Officer. | Additional Collector. |
| 11 | Landless Labour Certificate. | 15 | Tahsildar | Sub Divisional Officer. | Additional Collector. |
| 12 | Agriculturist Certificate. | 15 | Tahsildar | Sub Divisional Officer. | Additional Collector. |
| 13 | Certificate of Residence in Hilly Area. | 7 | Tahsildar | Sub Divisional Officer. | Additional Collector. |
| 14 | Attestation of Affidavit | 1 | Avval Karkun/ Nayab Tahsildar. | Nayab Tahsildar/ Tahsildar. | Sub Divisional Officer. |

Thane,

13th July 2015.

ASHOK SHINGARE,

Collector, Thane.

## पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांजकडून

## आदेश

क्रमांक विशा/ठा.म.न.पा./पोटनिवडणूक/मनाई आदेश/१०/२०१६.—ज्याअर्थी, अधिसूचनेनुसार राज्य निवडणूक आयोगाने, ठाणे महानगरपालिका प्रभाग क्र. ५३अ. व ३२अ या रिक्त पदाच्या पोट-निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

आदर्श आचारसंहिता दिनांक २८ जुलै २०१६ रोजी मध्यरात्री १२-०० पासून लागू झाली असून दिनांक २ ऑगस्ट २०१६ पासून ते दिनांक ९ ऑगस्ट २०१६ चे दरम्यान नामनिर्देशन पत्र देणे व स्वीकारणे तसेच दिनांक १० ऑगस्ट २०१६ रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी होऊन दिनांक १२ ऑगस्ट २०१६ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. दिनांक १३ ऑगस्ट २०१६ रोजी निवडणूक चिन्ह नेमून देणे, उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे, मतदान केंद्राची यादी प्रसिद्ध करणे इ. कामकाज होणार आहे. तसेच दिनांक २८ ऑगस्ट २०१६ रोजी मतदान होणार असून दिनांक २९ ऑगस्ट २०१६ रोजी मतमोजणी व निकाल जाहीर करावयाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

अशा वेळी ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ ठाणे अंतर्गत कळवा पो. स्टे. हद्दीतील ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ५३अ व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५, वागळे इस्टेट अंतर्गत श्रीनगर पोलीस स्टे. हद्दीतील ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ३२अ या प्रभाग क्षेत्रात मधील पोट-निवडणुकीचे नामनिर्देशन पत्रे देण्याच्या व स्वीकारण्याच्या ठिकाणी नौपाडा पो. स्टे. हद्दीतील ठाणे महानगरपालिका वारकरी भवन, संत गजानन महाराज चौक, राम मारूती रोड, ठाणे येथे निवडणूक संबंधाने राजकीय पक्ष आपआपले शक्ती प्रदर्शन करण्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस मोठ्या प्रमाणावर एकत्र येण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणांच्या प्रांगणात कॉर्नर मिटींग, सभा, पत्रकार परिषद, इत्यादी सारखे कर्यक्रम निवडणूक संबंधाने घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेमध्ये अडथळा येऊन सदर ठिकाणची शांतता भंग होण्याची दाट शक्यता आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी, आशुतोष डुम्बरे, पोलीस आयुक्त, ठाणे मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार अशा ठिकाणांच्या कार्यालयाच्या १०० मीटर चहुबाजूकडील परिसरात कोणत्याही पक्षाचे/संघटनेचे पदाधिकारी/कार्यकर्ते आणि प्रतिनिधी यांना निवडणूक संबंधाने सभा/बैठक/पत्रकार परिषद आदी कार्यक्रम घेण्यास प्रतिबंध करीत आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशन अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवाराने उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवार व त्याच्या सोबत दोन व्यक्ती यांनाच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षामध्ये प्रवेश देण्यात येईल. त्याचप्रमाणे उमेदवारी अर्ज दाखल करण्यास येणाऱ्या उमेदवारास नमूद ठिकाणच्या कार्यालयाच्या १०० मीटर चहुबाजूकडील परिसररात फक्त तीन वाहने आणण्याची परवानगी देण्यात येत असून तीन पेक्षा अधिक नौपाडा पो. स्टे. हद्दीतील ठाणे महानगरपालिका वारकरी भवन, संत गजानन महाराज चौक, राम मारूती रोड, ठाणे येथील सदर पोटनिवडणुकीचे नामनिर्देशन पत्रे देण्याच्या व स्वीकारण्याच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात आणण्यास प्रतिबंध घालण्यात येत आहे.

वरील आदेशाचे कोणीही व्यक्तीने उल्लंघन केल्यास अशा व्यक्तींविरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश दिनांक २ ऑगस्ट २०१६ रोजी ००-०१ पासून दिनांक १३ ऑगस्ट २०१६ रोजी २४-०० वा. पर्यंत अंमलात राहील.

सदर आदेश शासकीय कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना तसेच शासकीय/निमशासकीय, निवडणुक कामाशी संबंधित शासकीय/निमशासकीय, अधिकारी/कर्मचारी यांना लागू होणार नाही.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १ ऑगस्ट २०१६ रोजी ठाणे येथे जारी करण्यात आला आहे.

**आशुतोष डुम्बरे,**
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

---

## जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांजकडून

## शुद्धिपत्र

क्रमांक सामान्य/कक्ष-४/सेतू/एफ१४३३७६३४८७८८७.—महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. ३१) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा, याद्वारे उक्त अधिनियमाचे प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त महसूल कार्यालयामार्फत नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय प्राधिकारी या बाबीसंबंधी या कार्यालयाचे अधिसूचना समक्रमांक, दिनांक १३ जुलै २०१५ **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग एक कोकण विभागीय पुरवणी, गुरूवार ते बुधवार, जुलै १६-२२, २०१५ रोजी पृष्ठ क्र. ४५ ते ४७ वर प्रसिद्ध झाली असून सदर अधिसूचनेचे परिशिष्टामध्ये खालील प्रमाणे बदल अधिसूचित करीत आहे :—

परिशिष्टातील अनुक्रमांक २ येथील " जातीचे प्रमाणपत्र " ही लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा " २१ (दिवस) " ऐवजी " ४५ (दिवस) " असे वाचावे.

ठाणे,
दिनांक १ ऑगस्ट २०१६.

**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
जिल्हाधिकारी, ठाणे.

## BY THE COLLECTOR OF THANE DISTRICT

*CORRIGENDUM*

No.GEN/DESK-IV/SETU/F1433763487887.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 3 of the Maharashtra Right To Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015), I, Dr. Mahendra Kalyankar, Collector of Thane District, a notification regarding the public services rendered by the office of the Collector through the subordinate Revenue offices, along with the stipulated time limits for providing public services, the Designated Officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended in Notification even No., dated July 13th 2015 which was published in Maharashtra Government, Part I, Konkan Division Suppliment, Thursday to Wednesday, July 16-22, 2015 on page 45-47 is hereby partially revise as under :—

In Schedule shown at Sr. No. 2 "Caste Certificate" time limit for Providing service should be read as "45 (days)" instead of "21 (days)".

DR. MAHENDRA KALYANKAR,
Collector, Thane.

Thane,
dated 1st August 2016.

---

## पोलीस आयुक्त ठाणे शहर यांजकडून

**मनाई आदेश**

क्रमांक विशा/मनाई आदेश/१५/२०१६.—ज्याअर्थी, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून महागाई, वीज भारनियमन, पाणीटंचाई व जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता आहे. तसेच माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये दिनांक ७ ऑगस्ट २०१६ रोजी नागपंचमी, दिनांक १५ ऑगस्ट २०१६ रोजी स्वातंत्र दिन, दिनांक १७ ऑगस्ट २०१६ रोजी नारळी पौर्णिमा (पतेती) व दिनांक १८ ऑगस्ट २०१६ रोजी रक्षाबंधन असे सण साजरे होणार आहेत.

त्याअर्थी, वरील घटनांच्या अनुषंगाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मी, आशुतोष डुम्बरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन १९५१ चे कलम ३७(१) व (३) अन्वये जीवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जोपासण्यासाठी खालीलप्रमाणे मनाई आदेश देत आहे :—

(१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, लाठ्या किंवा शारीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तू बाळगणे.

(२) दगड किंवा क्षेपणस्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जमा करणे.

(३) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

(४) सार्वजनिक रीतीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे इत्यादी.

(५) व्यक्तीच्या किंवा प्रेताकृतीच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे.

(६) सभ्यता अगर निती या विरुद्ध असतील अशी किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील, किंवा ज्यामुळे राज्यशासन उलथून पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक, प्रदर्शित करणे.

(७) पाच किंवा पाचापेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इ. कृत्यांना या आदेशान्वये मनाई करीत आहे.

वरील मनाई आदेश खालील व्यक्तींना लागू होणार नाहीत :—

"जो कोणी इसम सरकारी नोकर आहे, किंवा ज्यास वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्र घेणे भाग पडेल, किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सूट दिलेली आहे."

सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागू राहणार नाहीत.

(१) लग्न कार्यासाठी जमलेले लोक.

(२) प्रेत यात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका.

(३) सरकारी/निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेऱ्या येथे जमलेले लोक.

(४) सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला जनसमुदाय.

(५) पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका.

(६) सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडीत असलेले ठिकाण.

सदर मनाई आदेश दिनांक ४ ऑगस्ट २०१६ रोजी ००-१० वाजेपासून दिनांक १८ ऑगस्ट २०१६ रोजी २४-०० वाजेपर्यंत अंमलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरूद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

ठाणे, **आशुतोष डुम्बरे,**
दिनांक २ ऑगस्ट २०१६. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.